# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, Legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक २३ वा शुक्रवार दि.२१ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## बारामतीत काका-पुतण्यात लढत?

बारामती : प्रतिनिधी बारामती लोकसभा निवडणुकीनंतर बारामती मतदारसंघातील राजकारण बदलून गेले आहे. अजित पवारांच्या मतदारसंघात सुप्रिया सुळेंना ५० हजारांहून अधिकचे लीड मिळाले. अजित पवार आपल्या पत्नीला स्वत:च्या मतदारसंघातही लीड देऊ शकले नाहीत. दरम्यान आता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार लढत होऊ शकते अशी शक्यता आहे. याबाबत युगेंद्र पवार यांनीही संकेत दिले आहेत.शरद पवार हे युगेंद्र पवारांना घेऊन आतापासूनच मैदानात उतरले आहेत. पवारांनी संपूर्ण तालुका पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. यामुळे अजित पवार यांच्या विरोधात त्यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार हेच मैदानात उतरणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान काटेवाडीत बोलताना युगेंद्र पवार म्हणाले, संपूर्ण बारामती आपलं घर असलं, तरीसुद्धा आपलं मूळ गाव काटेवाडी आहे. सर्वांत दबाव काटेवाडी, कन्हेरीमध्ये झाला. इथल्या अनेक स्थानिक पुढा-यांकडून झाला. तुम्हाला सोपा प्रश्न आहे, की साहेब बारामतीचे नसते, तर आज बारामती अशी असती का? साहेबांमुळे बारामतीचा खरा विकास झाल्याचे यावेळी युगेंद्र पवार यांनी नमूद केले.मंत्रालयात तुम्ही काटेवाडीचे आहेत असे सांगितले, की लगेच खुर्ची आणि मान मिळतो. आताच्या वेळी पैशांचा वापर झाला; पण ३ महिन्यांनी तुम्ही त्यांना दाखवून द्या, की १०० मतांनी आपण पुढे कसे पाहिजे.' तुम्ही अजिबात कमी पडला नाहीत, तुम्हाला धन्यवाद म्हणतो, अशा शब्दांत युगेंद्र पवार यांनी विधानसभा लढविण्याचे संकेत दिले.



## उच्च न्यायालयाने ६५ टक्के आरक्षण केले रद्द

पाटणा : पाटणा उच्च न्यायालयाकडून बिहार सरकारला मोठा धक्का बसला आहे. पाटणा उच्च न्यायालयाने बिहारमधील सरकारी नोक-या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ६५ टक्के आरक्षणाचा कायदा रद्द केला आहे. बिहार सरकारने जातीवर आधारित जनगणना केली होती आणि त्यानंतर ओबीसी, ईबीसी, दलित आणि आदिवासींचे आरक्षण ६५ टक्के करण्यात आले होते. मात्र, आता ती पाटणा उच्च न्यायालयात रद्द करण्यात आली आहे.बिहारमध्ये जेव्हा ६५ टक्के आरक्षण होते, तेव्हा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना १० टक्के आरक्षण देण्यात आले होते. यासह बिहारमध्ये नोकरी आणि प्रवेशाचा कोटा ७५ टक्के करण्यात आला आहे. यानंतर युथ फॉर इक्वॅलिटी नावाच्या संघटनेने त्याला पाटणा उच्च न्यायालयात आव्हान दिले आणि त्यावर आज सुनावणी झाली.

उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हा कायदा रद्द केला आहे. पाटणा उच्च न्यायालयाने ६५ टक्के आरक्षण घटनाबा ठरवले आहे. आता अनुसूचित जाती, जमाती, अत्यंत मागास आणि इतर मागासवर्गीयांना शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोक-यांमध्ये ६५ टक्के आरक्षण मिळणार नाही. ५० टक्के आरक्षणाची जुनी पद्धत लागू होणार आहे.



## वायू प्रदुषणामुळे वर्षभरात २१ लाख बळी!

नवी दिल्ली : वायुप्रदूषणामुळे जगभरात २०२१ साली ८१ लाख लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये भारतातील २१ लाख व चीनमधील २३ लाख मृतांचा समावेश होता, असे युनिसेफ व अमेरिकेतील हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट संस्था यांनी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त अहवालात म्हटले आहे.२०२१ साली वायुप्रदूषणामुळे पाच वर्षे वयाखालील मुले मोठ्या संख्येने मरण पावली. हा आकडा भारतात १,६९,४००, पाकमध्ये ६८,१०० होता. दक्षिण आशियामध्ये वायूप्रदूषणामुळे होणा-या मृत्यूचे प्रमाण मोठे आहे. २०२१मध्ये वायुप्रदूषणामुळे जगभरात सर्वाधिक मृत्यू झाले. वायू प्रदूषणाचा सर्वाधिक फटका गंगा नदी किना-यावर राहणा-या लोकांना बसत आहे. प्रदूषणामुळे गंगा किनारी राहणा-या लोकांचे आयुर्मान सात वर्षांनी घटले आहे. प्रदूषणामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे लोकांच्या फुफ्फुसे आणि हृदयावरच परिणाम होतो असे नाही तर मेंदूवर देखील परिणाम होतो. सध्या देशातील ९० टक्के लोक दूषित हवेतून श्वास घेत आहेत त्यामुळे मज्जारज्जूशी संबंधित आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाने हृदयरोग, कर्करोग व फुफ्फुसांचे आजार मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. वाढत्या प्रदूषणाचा परिणाम गर्भवती महिला, नवजात बालके व विद्यार्थ्यांवर देखील होऊ लागला आहे. वाढत्या प्रदूषणाला वेळीच आळा घातला नाही तर ही समस्या आणखी गंभीर होईल. तसे होऊ द्यायचे नसेल तर प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने आताच ठोस पावले उचलून नियोजन करायला हवे त्यासाठी पर्यावरण तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी.प्रदुषण कमी करणे गरजेचे हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट या संस्थेच्या अध्यक्ष एलेना क्राफ्ट यांनी सांगितले की, अहवालाच्या निष्कर्षांमुळे जनजागृती होईल व प्रदूषण कमी करण्यासाठी लोकांना प्रेरणा मिळेल. वायुप्रदूषणामुळे आरोग्यावर विपरित परिणाम होतात. ते प्रमाण कमी होण्यासाठी देशांनी प्रभावी उपाययोजना केली पाहिजे, असेही क्राफ्ट यांनी सांगितले.उपाय योजना अपु-या हे प्रदूषण कमी करण्यासाठी जगभरात विविध उपाय योजण्यात येत असले तरी ते पुरेसे नाहीत. लहान मुले, युवक, मध्यमवयीन लोक, वृद्ध व्यक्ती यांना वायुप्रदूषणामुळे खूप त्रास सोसावा लागतो.कारखानदारी मुख्य केंद्र औद्योगिकीकरणामुळे कारखानदारी वाढली. कारखान्यात तयार होणारे घातक रसायने हवेत सोडण्यास सुरवात झाली त्यामुळे हवा दूषित होऊ लागली. कारखान्यांमध्ये उत्पादनासाठी वापरण्यात येणा-या औद्योगिक प्रक्रियेमुळे वेगवेगळे विषारी वायू तयार होतात. कारखान्यातून उत्सर्जित होणारे होणारे हे विषारी वायू वातावरणात तरंगतात यामुळे वायुप्रदूषणात वाढ होते.



## मराठा आरक्षणासाठी अधिवेशनात एक दिवस राखीव ठेवा

### आमदार धिरज विलासराव देशमुख यांची राहुल नार्वेकर यांच्याकडे मागणी

लातूर / प्रतिनिधी : मराठा आरक्षणासाठी पावसाळी अधिवेशनात एक दिवस राखीव ठेवून चर्चा घडवावी, अशी मागणी लातूर ग्रामीणचे आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केली. या मागणीचे पत्र त्यांनी विधानसभा अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर यांना गुरुवारी दिले. पावसाळी अधिवेशन २७ जून ते १२ जुलै या कालावधीत होत आहे. मराठा समाजाच्या मागण्या अद्याप मान्य झाल्या नाहीत. मराठा समाजाला कायद्याच्या कसोटीवर टिकणारे आणि सगे-सोयऱ्यांच्या निकषात बसणारे आरक्षण मिळावे, अशी मागणी आहे. या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांना उपोषणाला बसावे लागत आहे. सरकार या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्र पाठवून विधानसभा अध्यक्ष श्री राहुल नार्वेकर यांच्याकडे अधिवेशनातील एक दिवस मराठा आरक्षणासाठी राखीव ठेवण्याची मागणी केली आहे. यावर्षी २० फेब्रुवारी रोजी विशेष अधिवेशन घेत राज्य सरकारने मराठा समाजाला १०% आरक्षण जाहीर केले, त्यातील तरतुदी आणि जानेवारीमध्ये वाशी येथे श्री. जरांगे पाटील यांना सरकारने दिलेल्या अश्वसानामध्ये फरक आहे. त्यामुळे श्री. जरांगे पाटील मागील आठवड्यात पुन्हा उपोषणास बसले होते. सरकारच्या आश्वासनाचा मान ठेऊन त्यांनी १३ जुलैपर्यंत उपोषण स्थगित केले आहे. फेब्रुवारीमध्ये आरक्षणाचा निर्णय घाईने घेतल्यामुळे आरक्षणाची वैधता आणि तरतुदी याबद्दल मराठा समाजामध्ये संशयाचे वातावरण आहे. याकडेही आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फूट पुतळा (स्टॅच्यू ऑफ नॉलेज) उभारण्यासाठी डिझायनर आणि सल्लागार अभियंता नेमण्याबाबत निविदा

### माजी खासदार सुधाकर शृंगारे यांच्या प्रयत्नांना यश माजी खासदार सुधाकर शृंगारे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

लातूर – माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी आपल्या कार्यकाळात अनेक विकास कामाबरोबर महापुरुषांचा प्रेरणादायी आदर्श जनतेसमोर ठेवत महापुरुषांच्या जयंत्या ,सण उत्सव साजरे करून आपल्या कार्यकाळात जनमाणसांमध्ये स्थान मिळवले. १४ एप्रिल २०२२ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य देखावा स्वरूपात पुतळा उभारण्यात आला. ही कलाकृती प्रत्यक्षात साकारण्यासाठी आंबेडकरी जनतेतून आंदोलन उपोषणे करण्यात आले. उपोषण व आंदोलनाची माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी दखल घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फूट पुतळा उभारण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू केले. पहिल्या टप्प्यात या कामासाठी माजी खासदार शृंगारे यांनी निधीही मंजूर करून घेतला आता या कामासाठी महानगरपालिकेच्या वतीने डिझायनर आणि सल्लागार अभियंता नेमण्याबाबत ई निविदा मागवल्या आहेत. माजी खासदार सुधाकर शृंगारे यांच्या प्रयत्नातून होत असलेल्या ७५ फूट पुतळ्याच्या पाठपुराव्याला यश आले असून याबद्दल लातूर लोकसभा मतदारसंघातील आंबेडकरी जनतेच्या वतीने व मतदार संघातील सर्व समाज बांधवांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## जीएसटी ऑडीट विभाग स्थलांतरास करसल्लागार संघटनेचा तीव्र विरोध

परभणी : वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागाची दि. १५ जुलै पासून पुनर्रचना करण्यात येणार असल्याचे आदेश २१ मे २०२४ रोजी काढण्यात आले आहेत. या आदेशानुसार नांदेड जीएसटी कार्यालयातील ऑडीटची कामे छत्रपती संभाजीनगरला जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. उपरोक्त निर्णयामुळे परभणी जिल्हा राज्यकर सहआयुक्त अपिले नांदेड यांच्याशी तोडून जालना राज्यकर सहआयुक्त जालना यांना जोडण्यात आला आहे. परभणी ते नांदेड अंतर ७० किलोमीटर होते. परंतू या निर्णयामुळे आता करसल्लागार व व्यापा-यांना दुप्पट म्हणजे १५० किलोमीटर अंतरावरील जालना कार्यालयात जावे लागणार आहे. वरील निर्णयामुळे घोडे मेले ओझ्याने आणि शिंगरू मेले हेलपाट्याने अशी अवस्था परभणी जिल्ह्याची होणार असून याला करसल्लागार संघटनेने तीव्र विरोध दर्शवित या संदर्भात सहायक राज्यकर आयुक्त परभणी धनंजय देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जीएसटी कायदा २०१७मध्ये लागू झाला आहे. तेव्हापासून नांदेड, लातूर, परभणी व हिंगोलीच्या जीएसटी विभागाचे ऑडीट विभागाचे कार्यालय नांदेड होते. परंतू मुंबईच्या राज्य जीएसटी आयुक्तांच्या आदेशान्वये छत्रपती संभाजीनगरला परभणी जिल्हा ऑडीटसाठी जोडला आहे. यामुळे व्यापारी, उद्योजक, अकाउटंट, करसल्लागार, सीए यांना आपल्या कामासाठी आता छत्रपती संभाजीनगरचे हेलपाटे मारावे लागणार आहेत. हे वेळ आणि आर्थिक दृष्टीकोणातून अजितबात परवडणारे नाही. परभणी जिल्ह्याचे कामकाज नांदेड विभागाशी जोडलेले असणे सर्वदृष्टीने सोयीचे आहे. परंतू परभणी जिल्ह्याला छत्रपती संभाजीनगरला जोडण्याने येण्याजाण्याचा वेळ, आर्थिक खर्च व शारीरिक श्रमाचा विचार करता ऑडिट करण्याचे कामकाज नाकीनऊ आणणारे होणार आहे. हा निर्णय करदाते, करसल्लागार, सीए यांच्यासाठी अतिशय त्रासदायक ठरणार असून वेळेचा मोठा अपव्यय होणार आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ मागे घेवून ऑडिट कामासाठी पुर्ववत नांदेड विभागाला परभणी जिल्हा जोडण्यात यावा अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. सहायक आयुक्त राज्यकर परभणी धनंजय देशमुख यांना निवेदन देताना करसल्लागार संघटनेचे अध्यक्ष सीए अरूणकुमार ओझा, सीए शाम धुत, संदीप भंडे, सीए रोहित मंत्री, ॲड. क-हाळे, एआयएफटीपीचे सहसचिव राजकुमार भांबरे आदि उपस्थित होते.

## जेएसपीएम शिक्षण संस्थेच्यावतीने जागतिक योग दिनानिमित्त योग शिबीर

लातूर दि.२०-०६-२०२४ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मांदी यांच्या प्रयत्नाने भारतीय पुरातन योग विद्येला जागतिक मान्यता मिळाली असून यामुळे जगात भारताचा गौरव वाढलेला आहे. २१ जून २०२४ रोजी जागतिक योग दिन साजरा केला जातो. या निमित्ताने जेएसपीएम संस्थेच्यावतीने महाराष्ट्र पतंजलिचे अध्यक्ष विष्णुजी भूतडा यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ जून रोजी सकाळी ८ वा. स्वामी विवेकानंद कॅम्पस एमआयडीसी लातूर येथे योग शिबीर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती लातूर आर्षयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष व जेएसपीएम शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी दिली.



## शिक्षण संस्थांवर आरएसएस-बीजेपीचा कब्जा

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-गाजातील संघर्ष रोखले असे सांगितले जाते. परंतु, देशातील नीट आणि नेट परीक्षेतील पेपरफुटी पंतप्रधान मोदी थांबवू शकले नाहीत, अशी टीका काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी केली आहे. नीट परीक्षेतील मोठा घोळ समोर आल्यानंतर १८ जून रोजी घेण्यात आलेली नेट परीक्षाही रद्द करण्यात आली. यावरून विरोधकांनी केंद्र सरकारला चांगलेच धारेवर धरले असून राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेला संबोधित करताना नीट आणि नेट परीक्षेवरून हल्लाबोल केला.

सर्व शिक्षण संस्था फरर आणि भाजपाच्या लोकांनी ताब्यात घेतल्या आहेत. या शिक्षण संस्था आरएसएस आणि भाजपामुक्त होत नाहीत, तोपर्यंत हे असे प्रकार सुरूच राहणार. पंतप्रधान मोदी नीट आणि नेट परीक्षेतील घोळ थांबवू शकले नाहीत. या सर्व गैरप्रकाराला जबाबदार कोण आहे. यासाठी जबाबदार असलेल्यांना पकडले गेले पाहिजे, अशी मागणी राहुल गांधी यांनी यावेळी बोलताना केली. या सर्व प्रकाराची चौकशी व्हायलाच हवी, हे आम्ही सुरुवातीपासून सांगत आहोत. ज्यांनी पेपर लीक केला, त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. आगामी लोकसभा निवडणुकीत यासंदर्भात सरकारला जाब विचारणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

सरकारबाबत विश्वासार्हता नाही या पेपरफुटीचे केंद्र मध्य प्रदेश, गुजरात आणि उत्तर प्रदेश आहे. सरकारबाबत विश्वासार्हता राहिलेली नाही. शिक्षण व्यवस्थेवर एकाच संघटनेने ताबा घेतला आहे. यातील पदांवर त्यांचेच लोक नियुक्त करण्यात आले आहेत. पंतप्रधान कोणताही निर्णय घेण्यास सक्षम नाही. त्यांचे सगळे लक्ष आता लोकसभा अध्यक्षांच्या निवडणुकीवर आहे. त्यांना सरकार आणि अध्यक्षपदाचीचिंता आहे.



पंतप्रधान मानसिकदृष्ट्या खचलेले आहेत. हे सरकार चालवण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहेत, असा दावाही राहुल गांधी यांनी केला.

पंतप्रधान सातत्याने जनतेत भीती निर्माण करतायेत पंतप्रधान जनतेत भीती निर्माण करून सरकार चालवत आहेत. मात्र, जनता आता घाबरत नाही. वाजपेयी किंवा मनमोहन सिंग असते, तर काहीतरी होऊ शकले असते. विनम्रता, सन्मान आणि प्रश्न सोडवण्याची क्षमता त्यांच्यात होती. मात्र, नरेंद्र मोदी या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत, या शब्दांत राहुल गांधी यांनी टीकास्त्र सोडले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# पर्यटनात नव्या संधींची चाहूल

डॉ. जयंतीलाल भंडारी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

अलीकडेच जागतिक आर्थिक मंचाने प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांक (टीटीडीआय) २०२४ जारी केला असून त्यात ११९ देशांच्या यादीत भारत ३९ व्या स्थानावर आहे. २०१९ मध्ये भारत ५४ व्या स्थानावर होता. नव्या 'टीटीडीआय'च्या निर्देशांकात नैसर्गिक निकषांनुसार भारत सहाव्या तसेच संस्कृती, बाजारपेठ, आरोग्य उपचार आणि शिक्षणाच्या दृष्टीने प्रवासासाठी भारत नवव्या स्थानी आहे. किंमत प्रतिस्पर्धेच्या प्रकरणात (हवाई भाडे, फिरण्याचा, राहण्याचा, खाण्यापिण्याचा खर्च) १८ व्या, तर हवाई प्रवासातील स्पर्धेच्या बाबतीत २६ व्या आणि पायाभूत सुविधांच्या बाबतीत २५ व्या स्थानावर आहे. पर्यटन निर्देशांकांचे विश्लेषण पाहिल्यास स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण, इंटरनेट सुविधा आणि पर्यटनाचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम यासारख्या निकषांवर भारताने आघाडी घेतल्याचे दिसून येते.

देशांतर्गत पर्यटनही वेगाने वाढत आहे आणि प्रामुख्याने धार्मिक पर्यटनात बूम आले आहे. देशांतर्गत पर्यटनस्थळी जागतिक पर्यटनाप्रमाणे सुविधा उपलब्ध करून दिल्यास आणि सौंदर्यीकरण केल्यास परदेशातील पर्यटनास प्राधान्य देणारे भारतीय देशातच फिरण्याबाबत उत्सुक राहतील. विशेष म्हणजे, जगाला सर्व प्रमुख पर्यटनस्थळांची ओळख ही खर्या अर्थाने निसर्ग सौंदर्याबरोबरच व्यावसायिक पद्धतीने तयार केलेल्या संग्रहालयानेही होते. शिवाय पायाभूत सुविधांची गुणवत्ता, सामान्यातील सामान्य पर्यटकांसाठीही उच्च गुणवत्तेची स्थानिक पातळीवरची परिवहन सेवा आणि वाजवी किमतीत निवासाची सोय, स्वच्छता तसेच सुरक्षित संचाराचीही गरज असते.

विशेष म्हणजे, जगातील सर्वाधिक परदेशी पर्यटक प्रामुख्याने फ्रान्स, स्पेन, अमेरिका, चीन आणि इटलीला जातात. याशिवाय सिंगापूर, व्हिएतनाम, थायलंड, इंडोनेशिया, हाँगकाँग, मलेशिया आणि संयुक्त अरब अमिरात (दुबई) यासारखे देशही आपल्या वैशिष्ट्यामुळे परदेशी पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतात. आजही जगातील एकूण परकी पर्यटकांचा विचार केला, तर दरवर्षी दोन टक्क्यांपेक्षा कमी पर्यटक भारताला भेट देत असल्याचे निदर्शनास आले आहे. पर्यटन उद्योग भारताच्या जीडीपीत सुमारे ६ टक्के योगदान देतो; परंतु यात केवळ ८ कोटी नागरिक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रोजगाराशी जोडले गेलेले आहेत. भारताकडे जगातील सर्वच पर्यटकांना आकर्षित करण्याची क्षमता आहे, यात कोणाचेही दुमत नाही; परंतु आपण अजूनही खूपच मागे आहोत. भारतात अनेक अनोखी पर्यटनस्थळे असून ती देशातील पर्यटन व्यवसायाला चालना देत आहेत. भारताच्या सांस्कृतिक वारशाने, संगीत, हस्तकला, खाद्यपदार्थांबरोबरच नैसर्गिक सौंदर्याने देशी आणि परदेशी पर्यटकांना नेहमीच भुरळ पाडली आहे.

सध्याच्या काळात पर्यटन क्षेत्रातील आघाडीचे देश आणि प्रसिद्ध पर्यटन स्थळे असललेल्या शेजारील देशांकडून भारतीय पर्यटकांना आकर्षित करण्याची चढाओढ लागली आहे. या देशांनी भारतीय नागरिकांची मानसिकता ओळखली आहे. अलीकडच्या काळात मध्यमवर्गीयांचे वाढते उत्पन्न आणि खर्च करण्याच्या प्रवृत्तीने त्यांच्यात परदेश पर्यटनांची आवड वाढली असून ही बाब शेजारील देशांनी ओळखली आहे. यामुळेच एकीकडे परदेशी पर्यटक भारताकडे संथ गतीने येत असताना भारतीय पर्यटकांच्या मात्र परदेशात उड्या पडत आहेत. सरकारने ४ डिसेंबर २०२३ रोजी दिलेल्या माहितीनुसार, २०२२ मध्ये भारतात आलेल्या परकी पर्यटकांची संख्या ८५.९ लाख होती, तर त्याचवर्षी सुमारे दोन कोटी भारतीयांनी जगात भ्रमंती केली. २३ मे २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'आरबीआय'च्या अहवालानुसार भारतीयांनी २०२३-२४ मध्ये परदेशात फिरण्यावर सुमारे १७ अब्ज डॉलर म्हणजेच १.४१ लाख कोटी रुपये खर्च केले. भारताची परदेशी पर्यटकांच्या आगमनाने कमाई वाढलेली असली, तरी भारतीयांकडून परदेशात जाण्यापोटी होणार्या खर्चाच्या तुलनेत परदेशी पर्यटकांकडून भारताला मिळणारा पैसा हा खूपच कमी आहे.

गेल्या दशकभरात देशांतर्गत पर्यटकांना, भाविकांना आणि परदेशी पर्यटकांना पर्यटनाचा अनुभव चांगला होण्यासाठी प्रयत्न केले जात असून त्याचबरोबर पर्यटन क्षेत्रात व्यापक पायाभूत सुविधा आणि त्याला जागतिक दर्जा देण्याचे काम केले जात आहे. पर्यटन बजेटमध्ये सातत्याने वाढ करण्यात आली. २०२३ मध्ये जी-२० परिषदेच्या काळात देशातील कानाकोपर्यात झालेल्या दोनशेपेक्षा अधिक बैठकांत सहभाग घेण्यासाठी आलेल्या परदेशी प्रतिनिधी आणि पाहुण्यांना भारताच्या पर्यटनस्थळांचे दर्शन घडविले. यानुसार भारताला देशातील पर्यटन केंद्रांची जागतिक पातळीवर प्रसिद्धी आणि प्रचार करण्याची नामी संधी मिळाली. तसेच भारताची जगात वाढणारी पत आणि राजकीय पातळीवरची प्रतिष्ठा पाहता परदेशी पर्यटक भारतात येण्यासाठी अधिक उत्सुक असून ती एक नवीन संधी म्हणून समोर येत आहे. अशावेळी भारताच्या पर्यटन क्षेत्राला अधिक सक्रिय करावे लागेल. यासाठी केंद्र, राज्य आणि पालिकेला समन्वयाने काम करावे लागेल.

भारताच्या सांस्कृतिक वारशाने, संगीत, हस्तकला, खाद्यपदार्थांबरोबरच नैसर्गिक सौंदर्याने देशी आणि परदेशी पर्यटकांना नेहमीच भुरळ पाडली आहे. भारताकडे हिमालयाचा सर्वाधिक भाग असून विशाल समुद्र किनारा, राजस्थानातील वाळवंट, कच्छ येथे पांढर्या मिठाचे आगर, मध्य प्रदेश, कर्नाटकातील घनदाट जंगल, लडाखमधील कडाक्याची थंडी, देशाच्या कानाकोपर्यात युनोस्कोने निवडलेल्या वारसास्थळांसह अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यान, नैसर्गिक संपदा आहे. ताज्या पर्यटन निर्देशांकाच्या निमित्ताने काही महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या असून त्याकडे भारताने लक्ष दिल्यास देशांतर्गत पर्यटन व्यवसाय आणखी बहरू शकतो.

# समाजात मैत्री भावना वाढवा आणि राजकीय शत्रू भावना मिटवा.

लोकसभा निवडणूका संपल्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या आणि पदाधिकऱ्यांच्या जबाबदारया संपल्या असतील तर आता गावातील माणसाकडे व नात्यातील माणसाकडे माणुसकीने पाहून मैत्री भावना वाढवा. राजकीय शत्रू भावना सोडून द्यावी. कारण भारत हा कधीकाळी कृषिप्रधान देश होता,सर्व कुटुंब शेती वर अवलंबून असत,आणि सर्वच कुटुंब हे एकत्र राहत होती.मुलांचे त्यांच्या मुलांचे म्हणजे नातु पंतु चे लग्न झाले तरी कुटुंब एकत्र जेवण बनवून एकत्र बसून खात होती.भावा बहिणीचे लग्न झाले नंतर त्यांच्या मुलामुलींचे लग्न झाले, एका आईवडिलांचे पांच मुलं, दोन बहिणी एकूण नऊ लोकांचे कुटुंब प्रत्येकाच्या लग्ना नंतर प्रथम वर्षी एकाने दुसऱ्यावर्षी दोन ने वाढत गेले,पण कुटुंबातील शांतता भंग पावली नाही. कुटुंबात नवीन लोक आली त्यांनी वडीलधाऱ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आचरण ठेवले,कधीच कोणी कोणाचा अपमान केला नाही, कधी कोणी कोणाला कमी समजत नव्हता. हे एकत्र कुटुंबातील संस्कार आपोआप नवीन पिढीवर होत जातात.दुरावा,अबोला,रुसवे फुगवे कधीच निर्माण झाले नाही.आजची परिस्थिति पाहिली की मन अस्वस्थ होते.मग कधी तरी निवांत बसून आयुष्यात येऊन गेलेल्या आणि दुरावलेल्या नात्यांचा डोळसपणे अभ्यास केला की लक्षात येतं की अनेक जण ज्यांना आपण आपल्याला दुखावलं म्हणून आयुष्यातून आपण वजा केलं होत ते अनेकदा समर्थनीय नव्हतंच.राजकारण हा धंदा झाला आहे.समाजसेवा वृत्ती त्यात राहिली नाही.त्यामुळेच शेतकरी,कामगार,विद्यार्थी,महिला,सर्वांचे आर्थिक सामाजिक शोषण एकच वेळी अनेक ठिकाणी होतांना दिसते. त्याकाळी कृषिप्रधान देशात कोणी कोणाचे शोषण करत नव्हता लोक काय म्हणतील,समाज काय म्हणेल हि भीती त्यांना होती. आज ती कुणाला च राहिली नाही. कृषिप्रधान देशात सर्वच हिंदू होते. जात धर्म तेव्हा ही होता. आज ही आहे. आज देशातील बहुसंख्य हिंदूचे शोषण कोण करतो?. शेतकरी,शेतमजूर,कामगार,विद्यार्थी .महिला बहुसंख्य कोण आहेत?. आणि राज्य करते राज्यातील केंद्रातील कोण आहेत. त्यांचात कोणती मैत्री भावना आहे?.

भावना दुखावल्या असं म्हणतं आपण आपल्या अहंकाराला विनाकारण जोपासत बसलो आणि सोन्यासारखी माणसं आपल्या प्रतिक्षेला कंटाळून आपापल्या मार्गे निघूनही गेली.त्यांची एखादी कृती,चूक हा जणू काही जन्म मरणाचा प्रश्न बनवून ती हकनाक आपल्या अहंकाराची बळी कधी झाली हे कळलंच नाही.नाजूक नात्यांना शेवटी अहंकार नाही तर मायेच्या ओलाव्याचीच गरज असते.आपण जसे जसे परिपक्व होत जातो तसं तसं लक्षात येतं की भावना आणि अहंकार ह्यांच्यात असलेली सूक्ष्म रेषा योग्य वेळी जाणून वागायला हवं होत.भावना क्षमाशील असते तर अहंकार मात्र एक घाव दोन तुकडे करून मोकळा होतो.भावना दुखावली असं आपण म्हणतो तेव्हा खूप वेळा भावना नाही तर अहंकार दुखावलेला असतो. अगदी एखादी आनंदाची बातमी जरी कुणी आपल्याला नंतर दिली तरी त्याच दुःख म्हणून त्यांचं अभिनंदनही आपण केलेलं नसतं आणि हे अनेकदा कळत नकळत घडतं.जगणं म्हणजे फक्त श्वास घेणं नसतं तर त्या जगण्यालाही स्वतःच असं वेगळं रूप आणि अस्तित्व असतं. हे समजून घेतले पाहिजे. आणि समजून देता आले पाहिजे. पूर्वी गावाच्या मंदिरात चावडीवर भजन कीर्तन होत होत होती त्यातून हेच खूप सोपी भाषेत समजावून सांगितल्या जात होते.



आता कुणाचंच कुणावाचून काही अडत नाही पण आयुष्यात आलेली चांगली माणसं जेव्हा गैरसमजुतींमुळे दुरावतात तेव्हा मात्र जर ती लोक आयुष्यात राहिली असती तर जगणं अजून सुंदर आणि अर्थपूर्ण झालं असतं असं मात्र नक्कीच वाटून जातं. पण ते मन मोकळे बोलण्याची हिंमत आजच्या माणसांत नाही. क्षणभंगुर आयुष्याचे लाड करताना आपल्या जगण्याचा दर्जा आपण राखायला हवा आणि ह्यासाठीच ते जगणं सुसंस्कृत आणि अर्थपूर्ण बनवणाऱ्या चांगल्या माणसांची ओळख आणि जोपासना करणं आणि अहंकारामुळे त्यांना न गमावणे हे जाणीवपूर्वक आपण करावं असं मनापासून वाटतं.ब-याचदा तर समोरच्या वागण्याचा आपण आपल्या मतानुसार अर्थ काढतो,तसा विचारही समोरच्याचा नसतो,तो सहज आपलं म्हणून वागत असतो.परंतु आपण चुकीचा अर्थ काढून समोरच्याला आयुष्यातून सहज काढून टाकतो.आणि आपला अहंकार आपल्याला या गोष्टीची जाणीवही होऊ देत नाही.म्हणून कुणाची कितीही मोठी चुक असली तरी ती आयुष्यापेक्षा,नात्यापेक्षा मोठी निश्चितच नाही.हे प्रत्येक कुटुंबातील माणसांनी लक्षात घेतली पाहिजे.कुटुंब,समाज,नगर,वॉर्ड,तालुका,जिल्हा. दोन महीने लोकसभा निवडणुकीतील राजकीय पक्षाच्या नेत्याच्या भूमिकेमुळे मन असो अथवा नसो त्या माणसांच्या मनात ढवळा ढवळ करून गेला.आयुष्या पेक्षा आणि नात्यापेक्षा मोठी उलाढाल राजकारणातील वातावरण करून गेले.आता त्यावर सर्वच व्यक्त होतात.ज्यांना राजकारणातील काहीच कळत नाही ते पण म्हणतात साहेबांनी अशी भूमिका घेतली पाहिजे होती.कोणत्या साहेबांची भूमिका बरोबर होती आणि कोणाची चुकली हे आता आपण का ठरवत बसतो?.कुणाची कितीही मोठी चुक झाली असली तरी ती आयुष्यापेक्षा आणि नात्यापेक्षा मोठी निश्चितच नाही.जे झाले ते विसरून सर्व समाजात मैत्री भावना वाढवा आणि राजकीय शत्रू भावना मिटवा.

********

सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,
भांडुप.मुंबई.

# ट्रेडमार्कचा वाद : मॅकडोनाल्ड्स पुन्हा बाद

मॅकडोनाल्ड्सने आयर्लंडमध्ये आपला 'मॅक' हा ट्रेडमार्क अंशतः गमावला आहे. त्याला कारण ठरला आहे 'सुपरमॅक'ने केलेला दावा. आंतरराष्ट्रीय फास्ट उपाहारगृह साखळी असलेल्या 'मॅकडोनाल्ड्स' मार्फत जगभरात 'बिग मॅक' या नावाने हॅम्बर्गर विकले जातात. डबल मॅक, मेगा मॅक, बिग बिग मॅक, डेनाली मॅक, महाराजा मॅक, लिट्ल मॅक, ग्रँड बिग मॅक असे त्याचे वेगवेगळे प्रकार उपलब्ध आहेत. थोडक्यात मॅकडोनाल्ड्सचा 'मॅक' हा ब्रँड/ ट्रेडमार्क जगभरात प्रसिद्ध आहे. पण आयर्लंडच्या 'सुपरमॅक'ने दाखल केलेल्या दाव्यावर निर्णय देताना युरोपियन युनियनच्या न्यायालयाने मॅकडोनाल्ड्सचे मॅक हा शब्द वापरण्याचे ट्रेडमार्क अधिकार रद्द केले आहेत. ५ जून २०२४ रोजी हा निकाल देण्यात आला.

या निकालाअन्वये मॅकडोनाल्ड्स आता आयर्लंडमध्ये काही विशिष्ट उत्पादने, पेये आणि रेस्टॉरंट सेवांसाठी 'मॅक' हा शब्द वापरू शकत नाही, मात्र चिकन नगेट्स, मांस, मासे, डुकराचे मांस आणि चिकन सँडविचसह सँडविच उत्पादनांसाठी 'मॅक' ट्रेडमार्क वारण्याचे हक्क कायम ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे मॅकडोनाल्ड्सने आपला मॅक हा ट्रेडमार्क अंशतः का होईना गमावला आहे.

ट्रेड मार्कचे एवढे महत्व का?

ग्राहकांना वस्तू खरेदी करताना दर्जाची खात्री अपेक्षित असते, तर दुसरीकडे स्पर्धेच्या बाजारपेठेत उत्पादक आणि वितरकांनाही आपला माल इतरांपेक्षा वेगळ्या दर्जाचा व गुणवत्तेचा आहे याची ओळख ग्राहकांना पटवून द्यायची असते. ग्राहकांच्या व उत्पादक आणि वितरकांच्या या गरजेवरचा उपाय आहे 'ट्रेडमार्क'. आपण बाजारातील अनेक वस्तूंवर एखादे विशिष्ट अक्षर, चिन्ह, खूण, शब्द, आकडा पाहतो आणि त्यावर 'टीएम' अशी इंग्रजी अक्षरे लिहिलेली असतात. त्यालाच ट्रेडमार्क म्हणतात. झपाट्याने विस्तारलेल्या प्रसिद्धी माध्यमांद्वारे ट्रेडमार्क सतत ग्राहकांसमोर ठेवणे स्पर्धेच्या बाजारपेठेत आवश्यक झाले. ट्रेडमार्कशी वस्तूच्या विशिष्ट दर्जाची खात्री व उत्पादकाची ख्याती जोडलेली असते. कंपनीला ग्राहक मिळवणे व टिकवणे ट्रेडमार्कमुळे सुलभ होते.



ट्रेडमार्क ही बौद्धिक संपदा आहे व तिला कायद्याचे संरक्षण आहे. ट्रेडमार्क कायद्यानुसार ट्रेडमार्कची नोंदणी केली जाते. नोंदणी करणाऱ्यास तो ट्रेडमार्क वापरण्याचा एकाधिकार मिळतो. त्याची परवानगी न घेता जसाच्या तसा किंवा त्याच्याशी साधर्म्य असलेला ट्रेडमार्क मुद्दाम किंवा ग्राहकांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने अन्य कोणी वापरला तर ट्रेडमार्क एकाधिकाराचे उल्लंघन होते व ट्रेडमार्कधारक त्यासाठी न्यायालयात जाऊन मनाई आदेश आणू शकतो आणि भरपाईसुद्धा मागू शकतो. थोडक्यात ट्रेडमार्क ही व्यवसाय व नफा वाढवण्यासाठी मदत करणारी कायदेशीर बौद्धिक संपदा आहे. मॅकडोनाल्ड्स आणि मॅक हा ट्रेडमार्क १९४० साली अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे मॅकडोनाल्ड्सने व्यवसाय सुरू केला. १९९६ मध्ये कंपनीने 'बिग मॅक' असे ट्रेडमार्क रजिस्ट्रेशन घेतले. सध्या त्यांची १२० देशांत ३७ हजार ८५५ फास्ट फूड रेस्टॉरंट्स आहेत. कंपनी दररोज ६९ दशलक्ष ग्राहकांना सेवा देते. कंपनीची वार्षिक विक्री सुमारे २५ अब्ज डॉलर्स असून नक्त नफा सुमारे सहा अब्ज डॉलर्स आहे. मॅकडोनाल्ड्सचे जागतिक ब्रँड मूल्यांकन सहाव्या क्रमांकाचे आहे. अशा या महाकाय आणि प्रचंड ब्रँड व्हल्यू असलेल्या बहुराष्ट्रीय कंपनीने आपला ट्रेडमार्क संरक्षित ठेवण्यासाठी बरेच काही केले. त्यातील एक उदाहरण म्हणजे बंगळुरूस्थित सॅनिटरीवेअर डीलर पीसी मल्लाप्पा अँड कंपनी यांच्या विरोधात मॅकडोनाल्ड्स कंपनीने कर्नाटकातील न्यायालयात १९९४ मध्ये केलेला दावा. मल्लाप्पा अँड कंपनीने 'गोल्डन एम' लोगोचे उल्लंघन केल्याचा दावा मॅकडोनाल्ड्सने केला होता. पूर्णपणे भिन्न व्यवसाय क्षेत्रात असूनही, पीसी मल्लाप्पा अँड कंपनीला आपला लोगो सोडावा लागला.

सुपरमॅकचा यशस्वी कायदेशीर लढा

या पार्श्वभूमीवर तुलनेने लहान असलेल्या सुपरमॅकने बलाढ्य मॅकडोनाल्ड्सशी कायदेशीर लढा देत मॅकडोनाल्ड्सचा मॅक ट्रेडमार्क अधिकार अंशतः रद्द केला. आयर्लंडमधील १०० हून अधिक फास्ट फूड रेस्टॉरंट्सच्या मालकीच्या 'सुपरमॅक'ने व्यवसाय विस्तार योजनेअंतर्गत युरोपियन युनियन बौद्धिक संपदा कार्यालयाकडे आपल्या कंपनीचे नाव नोंदविण्यासाठी अर्ज केला. त्याला मॅकडोनाल्ड्सने हरकत घेतली. 'बिग मॅक' हा आपला नोंदविलेला ट्रेडमार्क आहे आणि 'सुपरमॅक' या नावाने ग्राहकांचा गोंधळ होईल असे म्हटले. सुपरमॅक आणि बिग मॅक या नावातील समानतेबद्दल मॅकडोनाल्ड्सने २०१७ मध्ये लढाई अंशतः जिंकली होती आणि सुपरमॅक खटला अंशतः हरले होते. निकाल असा होता की ते त्यांच्या रेस्टॉरंटचे नाव सुपरमॅक ठेवू शकतात, परंतु त्यांच्या मेनूवरील आयटमची विक्री करण्यासाठी मॅक लेबल वापरू शकत नाही.

त्याविरोधात सुपरमॅकने अपील केले. मॅकडोनाल्ड्सने असा युक्तिवाद केला होता की मॅक हा आमचा कायदेशीर ट्रेडमार्क आहे आणि त्या शब्दाचा दीर्घ आणि सतत वापर केल्यामुळे, ग्राहकांना तो माहीत आहे. परंतु सुपरमॅकचा असा युक्तिवाद होता की मॅक हा 'आयर्लंड, युनायटेड किंगडम आणि इतरत्र संपूर्ण युरोपियन युनियनमध्ये आडनावांसाठी एक सामान्य उपसर्ग आहे'. आडनावाचा भाग म्हणून मॅक हा उपसर्ग असलेल्या पब, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि खाद्यपदार्थांची मोठी संख्या आहे. आयरिश फर्मने असा दावा केला की मॅकडोनाल्ड्सने मॅक हा उपसर्ग स्वतंत्र अर्थाने कधीही वापरला नाही, शिवाय युरोपियन युनियनच्या कायद्यानुसार ट्रेडमार्कचा वापर सतत पाच वर्षे केलेला असला पाहिजे. सुपरमॅकने मॅकडोनाल्डची बिग मॅक ट्रेडमार्क नोंदणी रद्द करण्यासाठी युरोपीयन युनियनच्या बौद्धिक संपदा कार्यालयाकडे २०१७ मध्ये विनंती केली. युरोपीयन युनियन बौद्धिक संपदा कार्यालयाने सुरुवातीला सुपरमॅकचा अर्ज मंजूर केला, परंतु नंतर मॅकडोनाल्डच्या अपीलावर निकाल देताना मॅकडोनाल्डच्या बिग मॅक हॅम्बर्गर्ससाठी ट्रेडमार्कला संरक्षण दिले. यावर सुपरमॅकने न्यायालयात धाव घेतली. त्याचा निकाल ५ जुन २०२४ रोजी लागला. सुपरमॅकने कोर्टाला सांगितले की मॅकडोनाल्ड्स त्याच्या चिकन बर्गरसाठी, ड्राईव्ह थ्रू आणि टेक अवे सेवांसाठी त्यांचा बिग मॅक ट्रेडमार्क वापरत नाही. हे युरोपीयन युनियनच्या ट्रेडमार्क कायद्याचे स्पष्ट उल्लंघन आहे. कारण कायद्यात सतत पाच वर्षे ट्रेडमार्क वापरण्याची अट आहे. तसे न केल्यास, न वापरलेला ट्रेडमार्क रद्द होऊ शकतो.

युरोपात मांस आणि पोल्ट्री हे भिन्न घटक


जगभरात मांस आणि पोल्ट्री हे वेगवेगळे घटक मानले जातात. या प्रकरणात सुपरमॅक कंपनीने असा दावा केला की बिग मॅकमध्ये मूलत: १०० टक्के बीफ मीट पॅटी आहे आणि मॅकडोनाल्ड्सनेही आपल्या उत्पादनाची जगभर ओळख तशीच करून दिली आहे. उदा. भारतात गोमांस खाणे हा विषय संवेदनशील असल्याने मॅकडोनाल्ड्सने भारतात आपली पॅटी चिकन किंवा मटण या सारख्या इतर मांसापुरती मर्यादित ठेवली आणि त्याला 'बिग मॅक' न म्हणता 'महाराजा मॅक' असे नाव देऊन त्याची विक्री केली जाते. इतर देशांतही चिकन पॅटीसाठी मॅकडोनाल्ड्सने आपल्या मेन्यू कार्डमध्ये बिग मॅक या ट्रेडमार्कचा पुरेसा वापर केलेला नाही. सुपरमॅकचा हा युक्तिवाद खोडून काढण्यासाठी मॅकडोनाल्ड्स पुरावा देऊ शकला नाही. मॅकडोनाल्ड्सने युरोपियन युनियनमधील मेनूमध्ये चिकन बिग मॅकवर पुरेसा भर दिला असला तरी, ते कधी केले हे दर्शविणारा पुरावा त्यांच्याकडे नव्हता, कारण मेनूमध्ये तारखा नसतात. ट्रेडमार्कने मॅकडोनाल्ड्सची चिकन बर्गरची विक्री कशी वाढवली हे दाखविण्यात ते अपयशी ठरले.

थोडक्यात मॅकडोनाल्ड्सने चिकन पॅटी या आपल्या उत्पादनविक्रीमध्ये 'बिग मॅक' या ट्रेड मार्कचा पुरेसा वापर केला नाही आणि तो ट्रेडमार्क वापरून चिकन पॅटीची विक्री वाढली हे ते सिद्ध करू शकले नाहीत. सबब ट्रेडमार्क कायद्यातील तरतुदींची पूर्तता न झाल्याने मॅकडोनाल्ड्सला चिकन पॅटी साठी 'बिग मॅक' हा ट्रेड मार्क अंशतः गमावावा लागला.

निकालाचा बोध सुपरमॅक या तुलनेने छोट्या कंपनीने मॅकडोनाल्ड्स या महाकाय बहुराष्ट्रीय कंपनीवर दावा करून अंशतः का होईना कायदेशीर मार्गाने ट्रेडमार्क रद्द करवला. या निकालाने २००९ सालच्या एका निकालाची आठवण होणे स्वाभाविक आहे. तो खटला मॅकडोनाल्ड्सने मलेशियातील 'मॅक करी' या एका भारतीयाच्या मालकीच्या अगदी छोट्या आणि एकमेव रेस्टॉरंटविरोधात भरला होता. 'मॅक' हा उपसर्ग मॅककरीने लाऊ नये, कारण 'मॅक'लावण्याचा अधिकार आमचा आहे असा दावा मॅकडोनाल्ड्सने मलेशियाच्या न्यायालयात केला होता. मॅक शब्द हे मलेशियन चिकनचे संक्षिप्त रूप आहे असा मुद्दा मॅक करीने मांडला. शिवाय मॅकडोनाल्ड्सचा ट्रेडमार्क केवळ 'एम'आहे 'एमसी' नाही हा तर्क आणि भिन्न पदार्थांचा व्यापार या तीन आधारांवर मॅककरीने मॅकडोनाल्ड्सच्या दाव्याला कसून विरोध केला. २००१ साली मॅकडोनाल्ड्सने केलेल्या दाव्याचा निकाल २००६ साली मॅकडोनाल्ड्सच्या बाजूने लागला आणि मॅककरीला 'मॅक' ही अक्षरे वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला. त्यावर मॅककरीने अपील केले. एप्रिल २००९ मध्ये कोर्ट ऑफ अपीलने २००६ चा निकाल रद्द केला आणि पूर्वस्थिती कायम केली. यावर मॅकडोनाल्ड्स सर्वोच्च न्यायालयात गेले. तीन सदस्यांच्या खंडपीठाने ८ सप्टेंबर २००९ रोजी एकमुखाने निर्णय दिला की मॅकडोनाल्ड्सच्या दाव्यात कोणतेही तथ्य नाही. मॅक या अक्षरांवर मॅकडोनाल्ड्सचा एकाधिकार असू शकत नाही. अन्य कोणीही मॅकडोनाल्ड्सपेक्षा भिन्न खाद्यपदार्थ पुरविण्याचा धंदा करत असेल तर त्याला मॅक ही अक्षरे वापरण्यास प्रतिबंध करता येणार नाही. ट्रेडमार्क, पेटंट्स असे बौद्धिक संपदा अधिकार मिळवून बाजारात एकाधिकारशाही मिळवायची आणि त्या जोरावर छोट्या स्पर्धकांना बाजारात प्रवेश करू द्यायचा नाही या वृत्तीला 'सुपरमॅक' काय किंवा 'मॅक करी' काय यांनी चाप लावला. ही कायदेशीर लढाई पैसा, कायदेशीर ज्ञान व तज्ज्ञता, वेळेची उपलब्धता अशा सर्वच बाबतींत विषम होती. परंतु मॅकडोनाल्ड्सचा दावा अवाजवी होता. ट्रेडमार्कमुळे मिळणाऱ्या एकाधिकाराचा, तो वापरण्याच्या गैरहेतूचा विचार या खटल्यात झाला. त्यातून मॅकडोनाल्ड्ससारख्या कंपन्यांना योग्य संदेश मिळेल आणि आणि लहान उद्योगांना प्रोत्साहन मिळेल अशी अशा करू या

# मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्याने पाठदुखीचा त्रास खरंच कमी होतो का? वाचा डॉक्टर काय सांगतात

ऑफिसमध्ये तासन् तास बसून काम केल्यामुळे आणि एका ठरावीक पद्धतीत बसल्यामुळे हल्ली अनेकांना पाठदुखीचा त्रास जाणवतोय. या पाठदुखीच्या समस्येवर अनेक उपाय केले जातात; पण काही फरक जाणवत नाही. डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या खाल्ल्यानंतर तात्पुरते बरे वाटते; पण काही दिवसांनी पुन्हा ही समस्या डोके वर काढते. अशा वेळी अनेक जण काही घरगुती उपाय करण्याचा सल्ला देतात. त्यातील एक उपाय म्हणजे मिठाच्या पाण्याने अंघोळ करणे. रोज पाण्यात मीठ घालून अंघोळ केल्यास पाठदुखीपासून आराम मिळतो, असे काही जण सुचवतात. पण, या उपायामुळे खरोखरच काही फायदा होऊ शकतो का, असा प्रश्न अनेकांना पडतो. याच प्रश्नावर दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना काही डॉक्टरांनी सविस्तर उत्तर दिले आहे, ते नेमके काय आहे ते जाणून घेऊ.



तुम्ही आतापर्यंत मिठाच्या पाण्याने गुळण्या करण्याचे फायदे ऐकले असतील; पण त्या पाण्याने अंघोळ करण्याचेही काही फायदे असतात हे फार क्वचित लोकांना माहीत आहे. याच विषयावर मॅक्स हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंट असोसिएट डायरेक्टर डॉ. अखिलेश यादव यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी संवाद साधताना म्हटले की, पाठदुखीचा त्रास असलेल्यांना मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्याने फायदा होऊ शकतो. त्यातही विशेषत: सैंधव मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्यास अधिक फायदा होईल.

एप्सम म्हणजे सैंधव मीठ हे मॅग्नेशियम सल्फेट (चसड्ज४) म्हणूनही ओळखले जाते. हे अंघोळीच्या कोमट पाण्यात विरघळते तेव्हा त्यातील मॅग्नेशियम हे तणावाची पातळी कमी करण्यास मदत करते. त्यामुळे जळजळ कमी होऊन स्नायूंना आराम मिळतो आणि वेदना कमी करण्यास मदत होते.

मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्यानंतर जाणवणारी ऊब तणाव आणि स्नायूदुखी कमी करू शकते. यावेळी शरीरास उष्माप्रेरित रक्ताभिसरणामुळे बरे वाटण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे शरीरास एक प्रकारे नवसंजीवनी मिळते, असे डॉ. यादव म्हणाले.

याबाबत हैदराबादमधील यशोदा हॉस्पिटल्सचे वरिष्ठ सल्लागार ऑर्थोपेडिक, रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट व ऑर्थो स्कोपिक सर्जन डॉ. सुनील दाचेपल्ली यांनी सहमती दर्शवीत म्हटले की, सैंधव मीठ म्हणजे एप्सम सॉल्ट बाथचा वापर खूप लोकप्रिय आहे. कारण– यामुळे अनेक समस्यांपासून आराम मिळतो. हे मीठ कोमट पाण्यात टाकून, त्या पाण्याने अंघोळ केल्यास अनेक समस्या दूर होतात. हे मीठ त्वचेद्वारे शोषले जात असल्यामुळे स्नायूंचे दुखणे कमी होते आणि त्यामुळे स्नायूंचे कार्य वाढते.

अशा प्रकारे आंघोळ केल्यास मिठाच्या पाण्याने स्नायूंना आराम मिळतो, तणाव कमी होतो आणि पाठदुखीमुळे होणारी समस्या दूर होते, असे डॉ. दाचेपल्ली म्हणाले.

त्यामुळे शरीर खूप ताजेतवाने वाटते. पाण्यात राहिल्याने गुरुत्वाकर्षणाचा ताण कमी होतो; ज्यामुळे पाठीचा कणा आणि सांध्यावरील दबाव कमी होण्यास मदत होते, असेही ते पुढे म्हणाले. सैंधव मिठाने कशी करायची अंघोळ?

सैंधव मिठाने पाठदुखीवर उपचार करण्यासाठी सर्वप्रमथ बाथटबमध्ये किंवा एक बादली कोमट पाणी घ्या. त्यानंतर त्यात दोन कप सैंधव मीठ घाला आणि १५–२० मिनिटे तसेच राहू द्या. आता हे पाणी अंघोळ करताना तुमच्या पाठीवर चांगल्या प्रकारे शेक देईल अशा प्रकारे टाका.

सैंधव मिठाने अंघोळ करण्यापूर्वी 'या' गोष्टींची घ्या काळजी

सैंधव मिठाच्या पाण्याने अंघोळ केल्याने तात्पुरत्या वेदना कमी होतात. पण, त्यामुळे सैंधव मिठाने अंघोळ केल्याने शरीराचे डिटॉक्सिफिकेशन होण्यास मदत होते, असे सांगणारे फार कमी वैज्ञानिक पुरावे आहेत, यावरही डॉ. यादव यांनी भर दिला.

त्यामुळे कोणताही नवीन उपचार सुरू करण्यापूर्वी आरोग्यतज्ज्ञांशी किंवा तुमच्या ओळखीच्या डॉक्टरांशी बोलणे नेहमीच योग्य ठरते. विशेषत: जर तुम्हाला काही वैद्यकीय समस्या असतील, तर कोणताही उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या, असेही डॉ. यादव म्हणाले.

# घरगुती या वस्तूंचा उपयोग केल्यास अकाली पांढरे केस होतील नैसर्गिकरित्या काळे

जर तुम्ही पांढरे केस नैर्सगिकरित्या काळे करण्यासाठी उपाय शोधत असाल तर तुमच्या स्वयंपाक घरातील या वस्तू नक्कीच चांगला उपाय ठरू शकतो हा उपाय फक्त सोप्पाच नाही तर खूप साधा, स्वस्त आणि प्रभावी आहे. तर चला जाणून घेऊ या कोणता आहे हा उपाय

आजकाल पांढरे केस होणे ही सामान्य समस्या झाली आहे.लहान मुलांपासून तर मोठ्यांपर्यंत अनेकांचे केस अकाली पांढरे होत आहे. पांढरे केस तुमचे व्यक्तिमत्वच नाही तर तर आत्मविश्वास देखील कमी करतात. अनेक लोक केसांना काळे करण्यासाठी हेयर प्रोडक्ट्स आणि नैसर्गिक उपायांची मदत घेतात. पण त्यामुळे विशेष फरक पडत नाही. म्हणून आज आम्ही तुम्हाला विशेष उपाय सांगणार आहोत ज्यामुळे तुमचे अकाली झालेले पांढरे केस काळे होण्यास मदत होईल.

पांढरे केस काळे करण्यासाठी आल्याच्या उपयोग–

आयुर्वेदात आले खूप महत्वाचे औषध सांगितले आहे.आले फक्त आरोग्यासाठीच नाही तर केसांसाठी देखील फायदेशीर आहे. आले मध्ये असलेले अँटीऑक्सीडेंट्स आणि अँटी–इंफ्लेमेटरी गुण तुमच्या केसांना काळे करण्यासाठी मदत करतात. दारू पिण्यासाठी अल्पवयीनांकडून ज्येष्ठ नागरिकाची हत्या, का वाढतोय गुन्ह्यांमध्ये मुलांचा सहभाग? यह वीनर्स नकली दांतों से ३०० गुना बेहतर है! और कीमत बहुत सस्ती है

और जानें आले हेयर पॅक– १ मोठा आले तुकडा २ मोठे चमचे नारळाचे तेल १ मोठा चमचा मध आले सोलून घ्या मग त्याचे छोटे छोटे तुकडे करावे. आता आले मिक्सरमधून बारीक करून त्याची पेस्ट करावी.या पेस्टला बाऊलमध्ये काढून त्यामध्ये नारळाचे तेल आणि मध मिक्स करावे. आता ही पेस्ट चांगल्या पद्धतीने केसांमध्ये लावावी. मग ३०–४० मिनिट केसांमध्ये लावून ठेवा. त्यानंतर



कोमट पाण्याने केस धुवून टाकावे.

आले हेयर पॅकचे फायदे– १. आले हेयर पॅक केसांना खोलवर पोषण डेरो आणि केस नैसर्गिकरित्या काळे होण्यास मदत होते. २. नारळाचे रेल केसांना मऊ बनवते आणि मध केसांची चमक वाढवते.

३. या हेयर पॅकचा नियमित उपयोग केल्यास केस काळे होण्यास मदत होते.

# शाळा संचालकांच्या कडून पालकांची होणारी लूट थांबणार तरी कधी..?.

परिक्षेच्या निकाला नंतर जुन महिना उजाडला कि पालकांची शाळा प्रवेशासाठी धावपळ सुरू होते.नर्सरी पासून पुढील उच्च शिक्षणा पर्यंत शाळा प्रवेश' हा शब्द ऐकताच हल्ली पालकांना घाम फुटतो.कारण ही तसच आहे.एकिकडे सरकारी शाळा शासन बंद करत आहे तर दुसरीकडे इग्रंजी माध्यमांची भरमसाठ फि हाल्ली इग्रंजी माध्यमा मध्ये नर्सरीची फि २० ते २५ हजाराच्या घरात आहे.आणि ती प्रत्येक पालकाला परवडतेच आस नाही प्रत्येक पालकाला वाटत आपलं मुल चांगल्या शाळे मध्ये आसव आपले मूल शाळेत जाणार,याचा आनंद दूरच,या उलट त्याला शाळेत घालण्यासाठी कोणते दिव्य पार करावे लागणार.याची चिंताच पालकांना सतावते आसते.

केंद्र सरकारने २००९ साली राईट टू एज्यूकेशन म्हणजेच ठढए कायदा पारित केला आहे.संविधानातील कमल २९ आणि ३० च्या तरतुदींना अधीन राहून हा अधिनियम 'बालकांना' लागू करण्यात आला.जणे करून गरिब मुलांना इग्रंजी मध्यमा मध्ये पहिली ते आठवी पर्यंत शिक्षण घेता येईल ते ही बंद होण्याच्या मार्गावर आहेत कारण ठढए मध्ये ही आता नियम बदलले आहेत. एका किलोमीटर आंतरावर जर मराठी मध्यमाची शाळा आसेल तर तुमचे ठढए मधुन इग्रंजी शाळे मध्ये तुमचा नबंर लागत नाही.

महाराष्ट्र सरकारने २१ मार्च २०१४ रोजी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) कायदा,२०११ हा कायदा लागू केला शाळेची प्रवेश प्रक्रिया,डोनेशन,शुल्क (फी) यासंदर्भात राज्य सरकारने विविध नियमवेळोवेळी ठरवून दिले आसताना ही वेळोवेळी परिपत्रके काढली आसतांना ही काही कायदे ही तयार केले आहेत. त्यामध्ये शिक्षा,दंड तसेच वेळप्रसंगी शाळेची मान्यता रद्द करण्याच्या आदेशाची तरतूद ही आहे. तरीही विविध शिक्षण संस्थांकडून वर्षानुवर्षे या सर्व नियमांची सर्रासपणे पायमल्ली होत आसताना दिसत आहे.यंदाचे वर्षही त्याला अपवाद नाही.

शिक्षण विभागातील अधिकारी आणि शाळा संस्थाचे साटेलोट असल्यानेच शाळांचे मनमानी कारभार होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सर्व खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा संचालकांनी परस्पर प्रवेश सुरू केले असल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात आहे. शाळा या आता शाळा राहिल्या नसुन मॉल झाल्या आहेत केवळ प्रवेश अर्ज,गणवेश,पिटी गणवेश,टाय,मोजे,शुज,स्कूल बॅंग,पुस्तक,नोट बुक,यासाठी पालकांकडून हजारोंच्या पटीत पैसे उकळले जात असून,एक ते पाच हजारा पर्यंत अशा अर्जांच्या किमती आहेत. काही ठिकाणी आशी हि परस्थिती आहे कि प्रवेश मिळेलच याची खात्री नसल्याने पालक हजारो रुपये खर्चून पर्याय म्हणून एकाहून अधिक शाळांमध्ये प्रवेश अर्ज भरत आहेत.शाळे कडून पालकांची ही लूट आणि दुसरीकडे मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय शासन घेत आहे. पालकांची ही लुट थांबणार तरी कधी असा प्रश्न सामान्य माणसाला सतावत आहे. म्हणून एका मराठी चित्रपटातील डायलॉग प्रमाणे म्हणावस वाटत शिक्षणाच्या आयचा...घो...

# रक्तातील साखर १५ ते १० टक्के कमी करण्यासाठी जेवणात 'या' दोन गोष्टी वापराव्याच? डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले फायदे व मर्यादा

आपण काय खातो याबरोबरच आपण जे खातो ते कसे बनवतो हा मुद्दा सुद्धा आपल्या आरोग्यावर बराच प्रभाव टाकत असतो. तळलेल्या पदार्थांपेक्षा वाफवलेले, उकडलेले पदार्थ हे आरोग्यासाठी उत्तम असतात असे तज्ज्ञांनी वारंवार यापूर्वीही सांगितले आहे. पण तुम्हाला माहित्येय का, या वाफवलेल्या पदार्थांमध्ये काही विशिष्ट गोष्टींची जोड दिल्यास त्याचा आरोग्याला उत्तम हातभार लागू शकतो. या जोडीच्या गोष्टी कोणत्या व त्याचे फायदे काय याविषयी आता आपण तज्ज्ञांकडून जाणून घेणार आहोत.

या अकाउंटवर शेअर करण्यात आलेल्या माहितीनुसार, पालेभाज्या, ब्रोकोली आणि भोपळी मिरची यांसारख्या स्टार्च नसलेल्या भाज्यांमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी आणि फायबर भरपूर असतं. फायबर साखरेचे शोषण कमी करते, रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवते. यामुळे इन्सुलिनची संवेदनशीलता वाढते. यात काही अभ्यासात असे सुचवण्यात आले की या भाज्या व एकूणच जेवणात ताज्या लिंबाचा रस पिळल्यास काही पदार्थांचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होण्यास मदत होते. लिंबाच्या रसातील आंबटपणा स्टार्चच्या पचनामध्ये व्यत्यय आणू शकतो, परिणामी रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. तर काळी मिरी पावडर इन्सुलिन संवेदनशीलता वाढवू शकते. यामुळे तुमच्या शरीराची ग्लुकोज (साखर) वापरण्याची क्षमता सुधारते. त्यामुळे जेवणात काळी मिरी व लिंबाचा रस वापरावा असे या पोस्टमध्ये सुचवण्यात आले आहे. तर हळद आणि मेथी सारख्या औषधी वनस्पती सुद्धा रक्तातील साखरेचे संतुलन आणि स्वादुपिंडाच्या कार्यास मदत करतात असेही नमूद करण्यात आले आहे. आता आपण याचा खरोखरच फायदा होतो का हे पाहूया..




लिंबू आणि काळी मिरी पावडर टाकून फायदा होईल का? मधुमेह असलेल्या रूग्णांसाठी रक्तातील ग्लुकोजची पातळी संतुलित राखणे नेहमीच कठीण काम असते. सोशल मीडियावरील प्रत्येक माहिती खरीच असेल असं समजू नये अशी कमेंट करत रिया देसाई, वरिष्ठ आहारतज्ज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, मीरा रोड, मुंबई यांनी इंडियन एक्सप्रेसला या उपायाविषयी माहिती दिली. उन्हाळ्यात एखाद्या शीतपेयामध्ये लिंबाच्या फोडी टाकल्याने, सॅलेड, भाज्यांमध्ये लिंबू पिळल्याने कार्बो हायड्रेट्सची पचन प्रक्रिया मंद होण्यास मदत होते. ज्यामुळे ग्लुकोज अधिक हळूहळू प्रक्रियेत रक्तप्रवाहात सोडले जाते. याचा फायदा असा की अचानक रक्तातील साखरेची पातळी वाढण्याचा धोका कमी होतो. शिवाय लिंबाचा रस अन्नामध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण वाचवतो. ज्यामुळे जळजळ व ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी होऊ शकतो.

थौसिया हसन, सल्लागार आहारतज्ज्ञ व पोषणतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, एचआरबीआर लेआउट, बंगळुरू यांनी सांगितले की, लिंबामध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म असणारे पॉलिफेनॉल असते जे शरीरासाठी फायदेशीर आहे. पॉलीफेनॉल इन्सुलिनचा प्रतिसाद सुधारून ग्लुकोजचे सेवन करण्यास अनुमती देते.

मिरपूडीच्या बाबत विचार करायचा तर त्याचा प्राथमिक फायदा म्हणजे पाइपरिनचा मुबलक साठा. हे एक असे सक्रिय कंपाऊंड आहे जे पोषक तत्वांचे शोषण वाढवते व चयापचय सुधारते. परिणामी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणाऱ्या पोषक तत्वांचा शरीराला पुरवठा होतो. पाइपरिन इन्सुलिन आणि ग्लुकोजच्या चयापचयाचे प्रमाण सुधारते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी आणखी नियंत्रित होते. असं असलं तरी, रक्तातील साखरेच्या पातळीत १५–२० टक्के घट सुचवणारा कोणताही अभ्यास नाही.

# या योग आसनाने मायग्रेनपासून मुक्ती मिळवा

अनेकांना मायग्रेनचा त्रास होतो. या अवस्थेत, डोके अर्धे दुखू लागते आणि हळूहळू ही वेदना वाढते. त्यामुळे अनेकांन,ा उलट्यांचा त्रासही होतो आणि ते दिवसभर झोपून राहतात आणि काहीही करू शकत नाहीत. यामध्ये तेजस्वी प्रकाश असह्य वाटतो. या दुखण्यापासून आराम मिळवण्यासाठी, चला जाणून घेऊया हाताच्या एका साध्या योगासनाविषयी. पान मुद्रा योग : ही हस्तमुद्रा करताना हातांचा आकार सुपारीच्या पानांसारखा होतो, म्हणून तिला पान मुद्रा असे म्हणतात. हस्त मुद्रा बनवण्याची पद्धत –



दोन्ही हातांची तर्जनी अंगठ्याने अशा प्रकारे जोडावी की मध्यभागी सुपारीच्या पानाचा आकार तयार होईल. उर्वरित सर्व बोटे उघडी राहतील. त्याचा फायदा– ही हस्तमुद्रा योग्य पद्धतीने केल्याने डोकेदुखी आणि अर्धी डोकेदुखी कमी वेळात दूर होते. यासोबत अनुलोम विलोम प्राणायाम देखील करा.

# आंबा १ वर्ष खराब होणार नाही, असा साठवून ठेवा वर्षभर स्वाद घ्या

उन्हाळ्यात येणारा फळांचा राजा आंबा याच्या सुगंधाने देखील लोक मंत्रमुग्ध होऊन जातात तर याच्या चवीबद्दल तर काय बोलायचे. कितीही आंबे खाल्ल्यावर समाधान काही होत नाही. आंब्याच्या गोडपणाच्या तुलनेत मिठाईची चवही फिकी वाटते. आंबा हे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचे आवडते फळ आहे. मात्र हे फळ काही महिन्यांपुरताच उपलब्ध असल्याने आंबाप्रेमी दु:खी असतात. उन्हाळ्याबरोबर आंबाही निघून जातो. तथापि तुम्ही आंब्याचा रस म्हणजेच आंब्याचा पल्प साठवू शकता. या युक्तीने तुम्ही मँगो पल्प वर्षभर साठवू शकता आणि वर्षभर मँगो शेकचा आनंद घेऊ शकता. आंबा कसा साठवायचा



माहित आहे?वर्षभर आंबा कसा साठवायचा? मँगो पल्प– आंबा जास्त काळ साठवून ठेवण्यासाठी लगदा वापरा. पिकलेल्या आंब्याचा लगदा काढून मिक्सरमध्ये नीट वाटून घ्या. आता काचेच्या बरणीत भरून ठेवा. तुम्हाला हवे तेव्हा मँगो आइस्क्रीम किंवा मँगो शेकमध्ये वापरू शकता.

आंब्याचे तुकडे साठवा – तुम्हाला हवे असल्यास तुम्ही आंब्याचे तुकडे सहज साठवून ठेवू शकता. सर्वप्रथम आंबा सोलून घ्या आणि नंतर त्याचे जाड तुकडे करा. आंब्याच्या बिया काढून त्या तुकड्यांवर थोडी पिठीसाखर शिंपडा. कापलेल्या आंब्याची प्लेट २–३ तास फ्रीझरमध्ये ठेवा. जेव्हा आंब्याचे तुकडे कडक होतात तेव्हा ते पॉलिथिनच्या पिशवीत झिप लॉकसह भरून हवाबंद डब्यात ठेवा. वापराच्या वेळी आंबा बाहेर काढा आणि आपल्या आवडीची डिश तयार करा आणि खा.

दारू पिण्यासाठी अल्पवयीनांकडून ज्येष्ठ नागरिकाची हत्या, का वाढतोय गुन्ह्यांमध्ये मुलांचा सहभाग?

सोने के पहले इसके बस १ कप से १ हफ्ते में ४.५ किलो चले जाएँगे

और जानें मँगो आइस क्यूब– जर तुम्हाला कोणताही त्रास नको असेल तर आंब्याची प्युरी बनवा आणि ती बर्फाच्या ट्रेमध्ये भरून फ्रीझ करा. आंब्याचा लगदा घट्ट झाल्यावर तो बाहेर काढा आणि झिप लॉक बॅगमध्ये ठेवा. यामुळे आंब्याचे चौकोनी तुकडे काढणेही सोपे होईल.

# रेल्वे, वन विभागाचे रखडले प्रश्न शेजारच्या तालुक्यातील प्रश्नांचे 'नव्या खासदारां'ना आव्हान

**दूरध्वनी सेवाही कोलमडली**
किनवट शहरात ४१ वेगवेगळ्या विभागाचे प्रमुख कार्यालये आहेत. एकाही कार्यालयात टेलिफोन नाही. अधिकारी कर्मचारी स्वतःचे मोबाइल क्वचितच उचलतात. ग्रामीण भागातून तालुक्याला येणाऱ्या लोकांना 'साहेब आहेत की नाही हे कळत नाही. मोबाइल लावला तर ते उचलत नाहीत. त्यामुळे कार्यालयातील दूरध्वनी सुरु राहणे गरजेचे आहे.

किनवट /शेख शौकत :–हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नागेश आष्टीकर यांच्याकडून किनवटकरांच्या आशा उंचावल्या आहेत. अगदी शेजारच्या तालुक्यातील उमेदवाराला येथील मतदारांनी खासदार बनविले. आता आमच्या तालुक्यातील रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाला वनविभागाची मंजुरी हे रखडलेले प्रश्न सोडून खासदार साहेब किनवटला विकासवाटेवर नेतील, अशी अपेक्षा मतदार बाळगून आहेत. नांदेडहून निघालेला १६१ ए क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर या मार्गे जातो. रिठातांडा, सावरी, बोधडटी, चिखली, वडोली, राजगडतांडा, सारखणी हा भाग जंगल क्षेत्र आहे. संपूर्ण सिमेंट कॉंक्रिटचा असलेल्या या मार्गावर जंगल क्षेत्रातील १४.८ कि.मी. अंतरावर मात्र सिमेंट कॉंक्रिट कामाला वनविभागाने परवानगी दिली नाही. परिणामी या मार्गाचे डांबरीकरण केले आहे. महामार्ग प्राधिकरणाने या भागातील काम उरकते घेतले आहे. वन क्षेत्रातील रस्त्याला वनविभागाची नाहरकत मिळविण्यात महामार्ग प्राधिकरणाला यश आले नव्हते. त्यामुळे आता ही जबाबदारी नव्या खासदारांवर येऊन ठेपली आहे इंटरसिटीची कटकट, जनतेची फरफट तिरुपती ते आदिलाबाद या कृष्णा एक्स्प्रेसवर अवलंबून असलेल्या आदिलाबाद ते नांदेड इंटरसिटीला दररोज विलंब होत आहे. कधी कधी तिला रद्द करण्याची वेळ रेल्वे विभागावर येत आहे. त्यामुळे या रेल्वेने प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांची मोठी परेशानी होत आहे. इंटरसिटीचा प्रश्न सोडविला तर किनवटकरांचा नांदेड या जिल्ह्याशी कनेक्ट वाढणार तर आहेच शिवाय सुलभ होणार आहे. बीएसएनएल या शासन अंगीकृत कंपनीचे मोबाइल देखील चालत नाहीत. परिणामी खासगी कंपन्या त्याचा लाभ घेतात.. तेव्हा नव्या खासदारांकडून या प्रश्नांवर तातडीने तोडगा निघेल, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

## बाभळगावातील वीज पडून दुर्दैवी मृत्यू झालेले शेतकरी अंगद शिंदे यांच्या वारसांना महसूल विभागाकडून ४ लाखांच्या आर्थिक मदतीचा धनादेश

लातुर / प्रतिनिधी : – लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील शेतात काम करीत असताना शेतकरी अंगद अंबादास शिंदे यांचा ११ मे रोजी अंगावर वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. शिंदे कुटुंबियांची परिस्थिती आणि अंगद शिंदे यांचा अकाली मृत्यू लक्षात घेता राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आणि बाभळगाव ग्रामपंचायतने केलेल्या पाठपूरावामुळे महसूल विभाग लातुर यांच्याकडून गुरुवार दि. २० जून रोजी मयत शेतकरी अंगद शिंदे यांच्या वारस असणाऱ्या त्यांच्या पत्नी मंगलबाई शिंदे यांना ४ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे, तसा आर्थिक मदतीचा धनादेश लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी लातुर शहर जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, उपसरपंच गोविंद




देशमुख, मंडळ अधिकारी सुनील लाडके, गोविंद जोशी, संतोष शिंदे यांची उपस्थिती होती. लातूर जिल्हयात पावसाळ्यात वीज पडून जीवितहानी होण्याच्या घटनात होणारी वाढ पाहता बाभळगाव येथे लायटनिंग अरेस्टेड टॉवर उभारण्यात यावे अशी मागणी बाभळगाव ग्रामपंचायतच्या वतीने एक ठराव घेऊन करण्यात आली असून याबाबतचे लेखी निवेदन देखील यावेळी लातुरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांना उपसरपंच गोविंद देशमुख यांनी दिले.

# छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे २४ जून रोजी लातूर येथे आयोजन

### पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते होणार उद्घाटन

लातूर :– येथील औसा रोडवरील वाडा हॉटेलजवळील कस्तुराई मंगल कार्यालय येथे २४ जून २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्यासह विविध कार्यालयाचे विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ या शिबिरासाठी उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये इयत्ता दहावी, बारावीनंतर काय ? भविष्यातील रोजगाराच्या संधी, व्यक्तीमत्व विकास, बायोडाटा तयार करणे व मुलाखतीची तयारी, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी याविषयी, तसेच शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देणाऱ्या बँका, विविध महामंडळे शासकीय योजनांची माहिती, कलमापन चाचणी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना व कर्ज योजना याबाबत माहिती व करिअर मार्गदर्शन तज्ज्ञ मार्गदर्शनाकडून मार्गदर्शन होणार आहे. लातूर येथे होत असलेल्या छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीरास सर्व युवक–युवती व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी कु. एम. आर. बोरुळकर आणि कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बी. एस. मरे यांनी केले आहे.

## आता शाळांमध्ये वाढदिवस साजरा करण्यास बंदी



बंगळूरू : सरकारने कर्नाटकातील सर्व शाळांमध्ये वाढदिवस साजरा करण्यावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. सरकारी, सरकारी अनुदानित आणि खासगी बालसंगोपन संस्थांमध्ये कर्मचारी, अधिकारी, खासगी व्यक्ती आणि त्यांच्या मुलांचा वाढदिवस साजरा करण्यावर या परिपत्रकात बंदी घालण्यात आली आहे.फेब्रुवारी २०२४ मध्ये केवळ राष्ट्रीय सुट्या, राज्याचा सण (नाडहब्ब) आणि जयंती साजरी करण्याचे आदेश दिले होते. हे सरकारी अधिसूचनेत स्पष्ट केले आहे. बालसंगोपन संस्थांमध्ये, कर्मचारी, अधिकारी, खासगी व्यक्ती, सेलिब्रिटी, राजकीय नेते, धर्मगुरू आदी स्वत:चा किंवा त्यांच्या मुलांचा वाढदिवस केक कापून आणि मुलांना मिठाई वाटून आनंदाने साजरा करतात. सरकारी, अनुदानित आणि खासगी बाल संगोपन संस्थांमध्ये नोंदणी केलेली मुले बालमजुरीतून सुटका झालेली, बालविवाहाला बळी पडलेली, अत्याचार झालेली, त्यांच्या पालकांनी नाकारलेली, अनाथ, भीक मागून सुटका केलेली आदी मुले आहेत. बाल न्याय मंडळांच्या आदेशानुसार देखभाल संस्था या सर्व वर्गातील मुले समाजाकडून वंचित आणि नाराज असल्याने, बालसंगोपन संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांच्या मनाला आनंद देतील आणि त्यांना आनंदी राहण्यास प्रोत्साहित करतील असे सर्जनशील कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

## उत्तम तरकसे यांच्या शाईची नोंद काव्यसंग्रहाला उत्कृष्ट साहित्यरत्न पुरस्कार

कोल्हापूर / प्रतिनिधी :– महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी–साहित्यिक तथा महाराष्ट्र पोलीस दलात नवी मुंबई क्राईम ब्रँच स्थित कार्यरत असलेले श्री उत्तम दासु तरकसे (असरडोहकर) यांच्या शांईची नोंद या काव्यसंग्रहाला पहिला पुरस्कार जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांचा उत्कृष्ट वांग्मय २०२४ चा पुरस्कार मिळाला. आत्ता मराठी साहित्यातील विविध प्रकारच्या दर्जेदार व उत्कृष्ट साहित्य निर्मिती व्हावी म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील महागाव येथील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून दरवर्षी उत्कृष्ट साहित्या करिता पुरस्कार दिले जातात. सदरचे पुरस्कार



साहित्य क्षेत्रात अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा २०२४ सालाचा उत्कृष्ट साहित्यरत्न पुरस्कार श्री उत्तम तरकसे यांच्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला मिळाल्याचे प्रा. रसूल सोलापुरे यांनी कळवले. प्रा. रसूल सोलापुरे व त्यांच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच परीक्षण करणाऱ्या परीक्षकांनी शाईची नोंद या काव्यसंग्रहाचा पुरस्काराकरिता निवड केल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत. उत्तम तरकसे यांच्या काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून त्यांच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होत आहे त्यामुळे त्यांनी सर्वांचेच खूप खूप मनापासून आभार मानले आहेत शानदार कार्यक्रमात सदर पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# अनुसूचित जमातीतील नागरिकांसाठी शबरी आवास योजना लाभ घेण्याचे लातूर मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी :– अनुसूचित जमातीतील नागरिकांसाठी राज्य शासनाच्या वतीने शबरी आवास योजना सुरू करण्यात आली असून पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे.या अंतर्गत अनुसूचित जमातीतील ज्या नागरिकाकडे स्वतःचे घर नाही अशांना योजनेतून घर बांधकाम करण्यासाठी अनुदान दिले जाणार आहे.यासाठी संबंधित व्यक्ती अनुसूचित जमातीतील असावा. त्याचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असावे. त्या व्यक्तीच्या नावे पक्के घर नसावे तसेच बांधकाम करण्यासाठी जागा असणे आवश्यक आहे.पात्र लाभार्थ्याचे बँक खाते गरजेचे आहे.संबंधित व्यक्ती १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. यापूर्वीच्या कुठल्याही घरकुल




योजनेचा लाभ त्याने घेतलेला नसावा. वार्षिक उत्पन्न तीन लाखांच्यावर नसावे,असे या योजनेचे निकष आहेत.

या योजनेत लाभार्थ्याला २६९ चौरस फूट क्षेत्रावर बांधकाम करावयाचे आहे.अर्ज मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्याला चार टप्प्यांमध्ये २.५० लक्ष रुपये अनुदानाचे वितरण केले जाणार आहे.

या योजनेसाठी अर्ज करताना लाभार्थ्यांनी रहिवासी प्रमाणपत्र, नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो,तीन लाख रुपयांच्यावर उत्पन्न नसल्याचे तहसीलदारांचे प्रमाणपत्र,रद्द केलेला धनादेश अथवा बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,जागा उत्पन्न उपलब्ध असल्याचा दाखला,शिधापत्रिका व आधार कार्ड ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

पात्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिनांक ०५ जुलै पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी महानगरपालिकेतील घरकुल योजना विभाग रुम.न.२ येथे संपर्क साधण्याचे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कंत्राटी कामगार वाहन चालक हयांच्या न्याय हक्कासाठी कामगार आक्रोश मोर्चा

मीरा भाईंदर /शहर प्रतिनिधि:– वंचित बहुजन आघाडी च्या वंचित बहुजन माथाड़ी ट्रांसपोर्ट व जनरल कामगार आघाडी.मीरा भाईंदर शहर तर्फे मा.आयुक्त साहेबांना वारणवार पत्र देण्यात आले होते मिनिमम कायदयानुसार किमान वेतन देण्यासाठी मनपा तर्फे देण्यात आलेल्या पत्राचे उत्तर कंत्राटदारा मार्फ़त देण्यात आले नाही. वाराणवार तक्रारी देऊन सुधा कंत्राटदार तसेच मीरा भाईंदर महानगर पालिकेतर्फे काहीच करवाई झाली नाही. तसेच कंत्राटदारावर सुधा करवाई झाली नाही. म्हणून दिनांक १९/०६/२०२४,बुधवार रोजी वेळ दुपारी २ वाजता कंत्राटी कामगार वाहन चालक हयांच्या न्याय हक्कासाठी सर्व कंत्राटी वाहन चालक तसेच कामगार ह्याना घेऊन मा.विश्वनाथ तायडे महासचिव वंचित बहुजन आघाडी हयांच्या अध्यक्षतेखाली मीरा भाईंदर महानगर पालिकेवर




आंदोलन करण्यात आले ह्या वेळेस मीरा भाईंदर शहरातील सफाई कामगार तसेच वाहन चालक हजर होते.तसेच अतिरिक्त आयुक्त यांच्याशी चर्चा झाली असता सर्व समस्ये वर लवकरच तोड़गा काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.या प्रश्नावर जर लवकर तोड़गा निघाला नाही तर गाड़ी बंद करो आंदोलन घेण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# लातूर पोलिस भरती प्रक्रिया सलग दुसऱ्या दिवशी सुरु









लातूर :– लातूर जिल्हा पोलीस दलातील रिक्त पदासाठी घेण्यात येत असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणी परीक्षा आज सलग दुसऱ्या दिवशी सुरू ठेवण्यात आली. पोलीस भरतीच्या दुसऱ्या दिवशी ७७४ उमेदवार व पहिल्या दिवशी राहिलेला एक उमेदवार असे ७७५ उमेदवारांना बोलविण्यात आले होते. मैदानी चाचणी प्रक्रिया करिता हजर ४६८ उमेदवारांपैकी ३७८ उमेदवार पुढील मैदानी चाचणीसाठी पात्र झाले. आजच्या मैदानी चाचणी प्रक्रियेसाठी उपस्थित उमेदवारांमध्ये पुरुष आणि महिला उमेदवारांचा समावेश होता. महिला उमेदवारांसाठी मैदानी चाचणीमध्ये ८०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे आणि गोळा फेक या ३ मैदानी चाचण्या आहेत. मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक २४ जून २०२४ पर्यंत चालणार आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE